सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००३९९१**

**अपिलार्थी श्रीम. वैशाली मंगेश पालवे**

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी**
हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित,
आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई ४०००१२.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित,
आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई ४०००१२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २९.०३.२०२३**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २६.०७.२०२२ | - | १२.०९.२०२२ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये अद्यापपर्यंत माहिती देण्यात आली नाही व जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ केली असे कारण नमुद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २६.०७.२०२२ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

a) *"हाफकिन महामंडळाच्या महा. व्यवस्थापक उत्पादन श्री. सुभाष शंकरराव यांच्याविरुध्द महिला लैंगिक शोषण कमिटी व मा. व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे किती महिलांनी तक्रारी केल्या आहेत त्याबाबत माहिती व त्यांचेविरुध्द केलेल्या कारवाईची माहिती द्यावी व साक्षांकित प्रती देण्यात याव्यात.*

b) *महिला समितीने २०१४ पासून ते आजपर्यंत किती महिलांना न्याय दिला आहे त्याची माहिती द्यावी."*

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी असे विशद केले की, त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नाही व प्रथम अपिलावर सुनावणी झालेली नाही व कोणतेही आदेश देण्यात आले नाही.

वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यास्तव त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(१) चा भंग केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेविरूध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये. याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच अपिलार्थी यांना माहिती आवश्यक असल्याने, आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे किंवा उत्तर देणे योग्य होईल.

अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००३९९९

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दि. १२.०९.२०२२ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्याविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज- २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि. ३१.०३.२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती किंवा सुस्पष्ट उत्तर १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, निशुल्क पुरवावी.**

**२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २६.०७.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**३) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दि. १२.०९.२०२२ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्याविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज- २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि. ३१.०३.२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरून शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

४) अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ०५.०४.२०२३**

## अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००३९९९

**अपिलार्थी श्रीम. वैशाली मंगेश पालवे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित,
आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई ४०००१२.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित,
आचार्य दोंदे मार्ग, परळ, मुंबई ४०००१२.

**(In continuation of order dtd ३१.०३.२०२३)**

उक्त प्रकरणी आयोगाने दि. ३१.०३.२०२३ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले होते:-

१) *"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती किंवा सुस्पष्ट उत्तर १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, निशुल्क पुरवावी.*

२) *जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २६.०७.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.*

३) *प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी दि. १२.०९.२०२२ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्याविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि. ३१.०३.२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगासमोर सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरून शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.*

४) *अपील निकाली काढण्यात येत आहे."*

२. सदर प्रकरणी आयोगाचे आदेश दि. ३१.०३.२०२३ रोजीच्या अनुषंगाने श्री. एस. बोरकर, जन माहिती अधिकारी तथा उप व्यवस्थापक (उत्पा) सा.प्र.वि. करिता, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, परळ, मुंबई यांनी दि. २७.०४.२०२३ रोजी खालीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे:-

..२/-

३१७

The Information as desired by the Applicant has been reviewed and appropriate reply (signed dt. 24th April, 2023) has been given to the applicant vide letter no. 423 dt.26th April 2023 in this regard as per the provisions of RTI Act, 2005.

The explanation for the not providing the information within the stipulated time and beyond is as follows:

The undersigned had been representing as the Public Information Officer for General Administration Dept as well as The Company Secretary Office. The Job responsibility of the undersigned is limited to the extent of legal matters and attending the Court proceedings as well as finalizing Affidavits in consultation with the Legal Advisor of the Company under the guidance of the Manager (Administration) or its subordinate. Besides as stated above, the undersigned does not get involved in the matters related to the daily routine activity of the General Administration dept., whereas the undersigned is responsible for the daily routine functioning of the Company Secretary Office and its related functional duties w.r.t. Companies Act, 2013.

The undersigned has been functioning as the Public Information Officer since 2018 vide Office Order no. 43/2018 dt. 05.02.2018 on behalf of the General Administration Dept. Any Information to be provided to the applicant under the provisions of the RTI Act, 2005, the General Administration dept. (GAD) through its Asstt. Information Officer provides the information w.r.t. GAD to the Public Information Officer and is thereafter provided to the applicant. The Public Information Officer, w.r.t. GAD has no direct authority to extract the information and is exclusively dependent on the Asstt. Information Officer of GAD for an effective execution of the RTI Application. The Asstt. Information Officer of GAD so appointed is an Establishment Officer who is directly reporting to the Manager (Admin) as well as General Manager (Production) and Managing Director as the situation demands.

The Subject information so desired by the applicant in her application dt. 26.07.2022 was received by the undersigned on 28.07.2022. Thereafter on 28.07.2022 the Asstt. Information Officer of GAD was intimated about the said application.

Since the information was to be obtained from the Manging Director's office and Women Sexual Harassment Committee. Accordingly letter no GAD/676 dt. 09th Aug, 2022 and GAD/675 dt. 09th Aug, 2022 respectively was issued to the said dept. and committee through GAD under the signature of P.I.O., GAD and received by the said dept and committee on 09th Aug, 2022 and 10th Aug, 2022 respectively. The relevant information in tabular form was provided by Managing Director's Office vide letter no. nil dt. 23rd Aug, 2022 and the Committee through its Committee members signature vide letter no म.लै.छ. / 2022 / साप्रवि/ गोपनिय / 43 dt. 25th Aug, 2022 has informed under the relevant provisions for the inspection of the collective information due to deficiency in clarity of information desired. Further the undersigned P.I.O., GAD in response to letter no म.लै.छ. / 2022 / साप्रवि/गोपनिय / 43 dt. 25th Aug, 2022, Asst. Information Officer, GAD was thereafter instructed for necessary action on 12th Oct, 2022.

..३/-

In response to the above comments dt. 12th Oct, 2022 the committee was requested to to fix time for said inspection of collective records vide letter no GAD/1001, dt. 05th Dec, 2022. However, the Committee did not respond to the communication dt 05th Dec, 2022, leading to no further processing of the RTI application.Further the Applicant had filed for the First Appeal at HBPCL on 12.09.2022. The undersigned in capacity of P.I.O., GAD was eagerly waiting for the reply from the concerned dept. for its reply and necessary information to be provided to the applicant, as well as First Appellate hearing wherein I could present my say for the pendency of information to be provided. Further, with due respect to the Second Appellate hearing held on 29th March, 2023, the undersigned has independently in consultation with Asst. Information Officer, GAD has replied to the RTI applicant vide letter no. 423 dt.26th April 2023 in this regard as per the provisions of RTI Act, 2005.

Sir, I further wish to state that the RTI Applicant was working in this Corporation in capacity of Manager (Administration) as well as executed the responsibility of First Appellate Authority in the Corporation. Also the P.I.O., GAD was and is exclusively dependent on the highest authority of GAD i.e. Manager (Administration) for providing any information to the Applicant. The Applicant is also fully aware of the functioning and its modalities of the GAD w.r.t. RTI applications and its compliances.

Further the RTI Applicant prior to the RTI application (dt. 26.07.2022) has filed an FIR against various officials of the Corporation on 14.07.2022. The Officials listed in the FIR includes Establishment Officer, GAD executing the responsibility of Asst. Information Officer of GAD as well as the other senior official being General Manager (Production) of the Corporation.

The above enlisted officials along with the other officials of the Corporation were unavailable during the period from FIR being filed and the Anticipatory Bail order being passed eventually in favour of Officials of the Corporation by the Hon'ble City Sessions Court. The General Manager (Production) & Asstt. Information Officer thereafter filed an Criminal Writ Petition before the Hon'ble Bombay High Court vide 3275 of 2022 & 3270 of 2022 respectively. Besides the above Hon'ble Bombay High Court and Hon'ble City Sessions Court, The relevant complaint of the RTI Applicant was also under the process of enquiry (July 2022 to December 2022 before the Corporation's Committee for Women Sexual harassment at work place in which the Asstt. Information Officer was also named in the complaint.

Based on the above facts and the situation with the Officials involved in the FIR filed, there was a delay in presenting the relevant information to the Public Information Officer, GAD, Hence the information and/or suitable reasoning for denying the information could not be done. Being the substance matter of information is related to the FIR being filed by the applicant and is pending before the Hon'ble Bombay High Court, Hence it is requested to consider the above explanation for not providing the information to the RTI applicant, and also to reconsider the proposed action to be taken on the undersigned as per sec 20(1) of the Rights to Information Act, 2005 to avoid personal financial loss on account of the dispute pending before the Hon'ble Bombay High Court between the RTI Applicant and the Asst. Information Officer, GAD.

..४/-

The undersigned has been dealing with the RTI applications on behalf of GAD, HBPCL since February 2018, vide GAD office order no 43/2018 dt. 05 FEB 2018 and has never indulged in any such activity of denying the information to the RTI applicant with malafied intention. With Humble request, I pray for the relief from the action to be taken u/s 20(1) of the Rights to Information Act 2005.

३. सदर प्रकरणी आयोगाचे आदेश दि. ३१.०३.२०२३ रोजीच्या अनुषंगाने श्री. उमेश साळकर, प्रथम अपिलीय अधिकारी, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, परळ, मुंबई यांनी दि. १९.०५.२०२३ रोजी खालीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे:-

*"मी श्री. उमेश प्रभाकर साळकर सद्यस्थितीत मला प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळात नियुक्त करण्यात आले आहे. माझी नियुक्ती हाफकिन महामंडळाच्या कार्यालय आदेश क्र. ०७/२०२३ दि. १०.०१.२०२३ नुसार करण्यात आलेली आहे. त्यापूर्वी दि.२१.०६.२०२२ पर्यंत अपिलार्थीच, अपिलीय अधिकारी असल्याने व त्यांच्या कंत्राटीतत्वावरील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर कोणीही अपिलीय अधिकारी नियुक्त नसल्याचे समजते. सदरचे प्रथम अपील ही दि. २३.०९.२०२२ रोजी करण्यात आली आहे म्हणजे माझ्या प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती पूर्वीचा आहे. अपील करण्यात आले त्यावेळी माझी अपिलीय अधिकारी म्हणून नियुक्ती झालेली नव्हती. आपल्या आदेशान्वये अपिलार्थीला दि. २६.०४.२०२३ रोजी त्यांच्या अर्जाबाबत माहिती देण्यात आली आहे.*

*महोदय, यापुढे विहित वेळेत अपील घेण्याबाबतची खबरदारी घेण्यात येईल व अर्जाचा वेळेत निपटारा केला जाईल. माझी आपणांस नम्र विनंती आहे की, माझ्या विरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र अर्ज के मा अर्ज २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ दिनांक ३१.०३.२००८ नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येवू नये अशी नम्र विनंती आपणांस करीत आहे."*

४. श्री. एस. बोरकर, जन माहिती अधिकारी तथा उप व्यवस्थापक (उत्पा) सा.प्र.वि. करिता, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, परळ, मुंबई व श्री. उमेश साळकर, प्रथम अपिलीय अधिकारी, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ, परळ, मुंबई यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. सबब आदेश पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करुन दि. ३१.०३.२०२३ रोजीच्या आयोगाच्या आदेशानुसार प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचा खुलासा मान्य करुन दि. ३१.०३.२०२३ रोजीच्या आयोगाच्या आदेशानुसार प्रस्तावित शिस्तभंगविषयक कार्यवाही रद्द करण्यात येत आहे. सदर अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२६**

State Information Commission
Greater Mumbai

29-5-2026
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**